International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगारविषयक विचार व कार्य

**डॉ. सपकाळ रामेश्वर विक्रम**
नाईट कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, इचलकरंजी.
Email- ramsapkal87@gmail.com

**प्रस्तावना:**

आधुनिक भारताच्या निर्मितीमध्ये अनेक विचारवंतांचे योगदान आहे. त्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव अग्रस्थानी आहे. आधुनिकीकरणाबरोबर औद्योगिक विकास अनिवार्यपणे येतो आणि उद्योग म्हटले की मालक कामगार संघर्ष अटळ. भारतामध्ये बिटिश साम्रज्यवादाच्या लाटे मधून आधुनिक उद्योगधंदयांना चालना मिळाली. याच काळत मुंबई व कलकत्ता सारख्या शहरामध्ये उद्योग धंदयाबरोबर मोठया प्रमाणात कामगार वर्गाचा उदय झाला. सन 1917 मध्ये कामगाराच्या कार्याचा पुरस्कार करणारी क्रांती रशियामध्ये झाली. त्याचे पडसाद जगभरातील कामगार वर्गावर पडले. कामगारांमध्ये आपल्या हक्क व अधिकारांप्रती जागृती झाली.भारतामध्ये सन 1920 मध्ये मजुर संघाची स्थापना झाली. 1890 च्या दशकापासून मुंबईतील कापड गिरण्यातून व कलकत्ता येथील कारखान्यातून काम करणारा मजुर वर्ग संघटीत होऊ लागला. भांडवलदारांच्या पिळवणूक व शोषणाच्या धोरणामुळे कामगार वर्ग पीचून निघाला. त्यातूनच कामगारांच्या हक्क व मागण्या भारतामध्ये जोर धरू लागल्या त्यासाठी अनेक कामगार संघटना उभ्या राहिल्या. त्यामध्ये डॉ.बाबासाहेबांनी पोटतिडकीने कामगारावरील अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी कारखाने, शेती, बिगारी, भूमिहीन, दलित, कापड गिरणी, खोतपध्दती अश्या अनेक उद्योगामध्ये काम करणाऱ्या कामगार वर्गासाठी कार्य कले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तत्कालिन कामागारांच्या समश्या व होणारी पिळवणूक थांबविण्यासाठी संघर्ष केला. कामगारविषयक सखोल चिंतन व मनन करून दूरगामी विचार मांडले. ज्यामध्ये मालक व कामगार हक्काचे समतोल राखल्या जाईल. कामगार वर्गाच्या कल्याणासाठी त्यांनी 'स्वतंत्र मजुर पक्षा'ची स्थापना केली. भारताच्या सामाजिक व आर्थिक विकासाच्या धोरणामध्ये अतीशय सखोल अभ्यासपूर्ण आर्थिक विचार मांडले त्यामध्ये कामगारांचे स्थान अधोरेखित करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. आजपर्यंत विशिष्ट सामाजिक घटकांचा नेता म्हणूनच त्यांची प्रतीमा उभी केली जाते. परंतू त्यांनी कागमार वर्गासाठी केलेल्या कार्यकडे दुर्लक्ष्य केले जाते, त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधन पेपरमधून मांडण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

**कामगारांचे शोषण करणारा वर्ग:**

ब्रिटीश साम्राज्यवादाच्या लाटेतून आधुनिक उद्योगांना चालन मिळून कामगार वर्गाची पिळवणूक मोठया प्रमाणात होऊ लागली. परंतू डॉ.बाबासाहेबांच्या मते, भारतातील कामगारांचे शोषण व इतर देशातील कामगारांचे शोषण यामध्ये फरक आहे. भारतामध्ये कारखाना मालकांबरोबर विशिष्ट पारंपारिक विचारसरणीचा फटका कामगार वर्गांना बसत असे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, कामगारांचे दोन शत्रू आहेत भांडवलदार व ब्राम्हणशाही. कामगारांची 'जात' केवळ कामगारच आहे म्हणून त्यांच्यात भेदभाव असता कामा नये, असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे म्हणणे होते. म्हणून त्यांनी मनमाड येथील 13 फेब्रु 1938 झालेल्या भाषणात अस्पृश्य म्हणून नव्हे तर कामगार म्हणून एकत्र आल्याबद्दल समाधान व्यक्त करून म्हटले 'माझ्यामते, या देशातील कामगारांना दोन शत्रूंशी तोंड दयावे लागते हे दोन शत्रू म्हणजे ब्राम्हणशाही व भांडवलशाही होय.... ब्राम्हणशाही या शब्दाने ब्राम्हणजातीची सत्ता हक्क व तिचे हितसंबध मला सुचवायचे नाहीत. त्या अर्थाने हा शब्द मी येथे वापरत नाही. ब्राम्हणशाही या शब्दाचा स्वातंत्र, समता व बंधुत्व या तत्वाचा अभाव असा अर्थ मला अभिप्रेत आहे.[1]

**खोत पध्दती व शेतमजुर कार्य :** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ कारखाण्यात काम करणाऱ्या कामगारांचाच विचार केला नाही. तर शेतीवर राबाणाऱ्या, काम करणाऱ्या कामगारांचेही प्रश्न त्यांना सतावत होते. कामाचे तास, प्रोव्हिडंड फंड, आरोग्यविषयक विमा, मालकाची असणारी जबाबदारी, नुकसान भरपाई असे कायदे ज्याप्रमाणे औद्योगिक कामगारांना लागू आहेत. त्याप्रमाणे शेतीवर राबणाऱ्या कामगारांनाही ते लागु करावेत असे त्यांना वाटत होते कोकणामध्ये खोत पध्दत रूढ होती त्या पध्दतीला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विरोध होता. दि.14 एप्रील 1929 रोजी चिपळूण येथे खोतीजमीनदारी पध्दती विरूध्द आयोजित परिषदेत अध्यक्ष म्हणून बोलतांना ते म्हणाले, की अस्पृश्य कामगारांना इतर कामगारांचे हक्क मिळवून देणे माझे कर्तव्य आहे. खोती सारखी दृष्ट पध्दत नष्ट झाली पाहिजे. सन 1937 ला मुंबई कायदेमंडळात खोती पध्दत नष्ट करण्यासाठी त्यांनी विधेयक मांडलेले दिसून येते. त्याचबरोबर त्यांनी खोतीपध्दतीच्या जाचातून ज्यांना मुक्तता करून घ्यावयाची असेल त्यांनी स्थलांतर करावे, त्यांच्यासाठी

एखाद्या दूरच्या संस्थानामध्ये लागवडी करिता जमीन मिळविण्यासाठी आपण प्रयत्न करू असे आश्वासन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी परिषदेमध्ये दिले. [2]

**कामगारांच्या संपाबाबत विचार** : डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांच्या संप करण्याच्या अधिकाराबाबत वेळोवेळी आपली मते मांडली आहेत. ते म्हणतात की कामगार हा मनुष्य आहे. मानवाचे जे हक्क आहेत ते कामगारांना देखील असणे आवश्यक आहे. कामगारांवर अन्याय होत असेल तर विधायक मार्गाने संप करण्याचा अधिकार त्यांना असला पाहिजे. पण भारतामध्ये कामगारवर्गाचे जे संप व चळवळी झाल्या त्यांचा मुख्य उद्देश्य हा कामगाराच्या हितापेक्षा राज्यक्रांतीच्या उद्देशाने अधिक प्रेरीत झालेले दिसतात. त्यामुळे या चळवळी खऱ्या अर्थाने चळवळी नाहीत. त्यांच्या मते, संपाचे हत्यार जपून वापरावे शिवाय त्यांचा उददेश्य हा कामगारांचे हित असला पाहिजे. [3] कम्युनिष्ट नेत्यांच्या राजकीय उददीष्टासाठी त्याचा वापर केला जाऊ नये असे त्यांचे स्पष्ट मत होते.

**महिला कामगारांबाबत विचार व कार्य:**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी नेहमी स्त्रीपुरूष समानतेचा पुरस्कार केला. कामाचा मोबदला सुध्दा सर्वांना समान मिळाला पाहिजे असे त्यांचे ठाम मत होते. म्हणूनच पुरूष कामगारांसंबधी कार्याबरोबर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री कामगारांसाठी महत्वपूर्ण कार्य केले. महिला कामगारांसाठी डॉ.बाबासाहेबांनी संविधानात विशेष कलमांची निर्मीती केली. त्यानुसार त्यांच्या सन्मानसाठी कलम 14 नुसार कामगार स्त्री असो किंवा पूरूष मतभेद न मानता समान संरक्षण, कलम 15 नुसार धर्म, जात व लिंग याबबतीत मतभेद न करता सर्वांना समान संरक्षण, कलम 39 नुसार समान काम समान वेतन, कलम 42 नुसार गर्भवती महिलास प्रसुति रजा. अश्या अनेक महिला कामगारांच्या समश्या त्यांनी सोडविल्या. आजही त्यांच्या कार्याची दखल घ्यावी लागते.

**कामगार संघटनासंबधी विचार व महत्व :**

कामगारांच्या संघटनाविषयी व चळवळी विषयी डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, "समाजाची पुर्नरचना घडून आणणे व स्वातंज्य समता बंधूता निर्माण करणे हे त्यांचे प्राथमिक स्वरूपाचे ध्येय असले पाहिजे" कामगार संघटना हया नेहमीच राजकीय सत्तेपासून लांब राहिलेल्या आहेत. मात्र राजकीय सत्ता हातात असल्याशिवाय स्वतःचा विकास करता येत नाही आणि म्हणून कामगारांनी प्रत्यक्षात शासन कारभारात सहभागी झाले पाहिजे. राजकीय सत्ता हस्तगत करणे हे त्यांनी आपले ध्येय ठेवले पाहिजे. कामगार संघटनांनी राजकारणापासून अलिप्त राहण्याचा कधीच प्रयत्न करू नये. नाही तर तो त्यांना अभिशाप ठरेल असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.[4] त्यांच्या मते क्षेत्र कोणतेही असो संघटना महत्वाची असते, संटनेने विधायक मार्गाने कार्य केले पाहिजे.

**'स्वतंत्र मजुर पक्षा'ची स्थापना व कार्य:**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर कामगार वर्गासाठी केवळ संप, कामगारांच्या मागण्या व समस्या मांडत बसले नाही. कामगारांना आपल्या हक्क प्राप्तीसाठी राजकीय व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यातूनच 'स्वतंत्र मजुर पक्षाची' स्थापना झाली. त्यांच्या मते, 'कोणत्याही समाजात त्या देशातील सर्वसामान्य जनतेचा जीवनमार्ग हा राजकीय परिस्थितीने घडविलेला असतो. राजकीय सत्ता जनतेच्या आकांक्षांना मूर्त रूप देत असते. ती ज्यांच्या हातात असते त्यांना आपल्या आशा आकाक्षांना मूर्त रूप देण्याची संधी प्राप्त होते. सत्ता त्यांचीच बतीक बनत असते.' हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखले होते. या देशातील कॉंग्रस पक्षाचे नेतृत्व भांडवलदार व जमिनदार व ब्राम्हणवर्ग यांच्या हातात असल्याने राजकीय सत्ता त्यांच्याच हाती जाईल व येथील दलित, कष्टकरी समाज गुलामासारखा राबविला जाईल' असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते. असे होऊ नये यासाठी त्यांनी लोकशाही मूल्यांवर आधारित असणारा 'स्वतंत्र मजुर पक्ष ' सन 1936 मध्ये स्थापन केला.[5] प्रस्थापित संघटना व कॉंग्रेस कामगार वर्गाचे प्रश्न सोडवू शकत नाही आणि भारतीय कम्युनिष्टांचा मार्ग अव्यवहार्य असल्यामुळे डॉ.बाबासाहेबांनी ऑगस्ट 1936 मध्ये 'स्वतंत्र मजुर पक्षा'ची स्थापना केली.[6] पक्षाच्या जाहीरनाम्यात म्हटले 'भूमिहीन गरिब कुळे शेतकरी आणि कामगारांच्या हिताच्या दृष्टीने कायदे करण्याची शिकस्त, नोकऱ्या देणे, कारखाण्यात बढती देणे, कामाच्या तासाची कमाल मर्यादा व वेतनश्रेणी, भरपगारी रजा देणे, कामगारांना स्वस्त आणि आरोग्यवर्धक वसतीस्थानाची तरतूद करणे.' इत्यादी प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी वचनबध्द आहे. स्वतंत्र मजुर पक्षाने खालील कार्यावर भर दिला.

1. 'दि फॅक्टरी ॲक्ट अमेंडमेंट बील' पास करून कामगरांना, श्रमिकांना व बाल कामगारांना रजा देण्यासंबधी कायदा केला गेला.
2. कोळसा खाण कामगार फंडाची स्थापना सन 1944 ला करण्यात आली.
3. 1946 ला 'मिका माईन्स लेबर वेलफेअर' फंडाची स्थापना करण्यात आली. कामगारांच्या लहान मुलांसाठी पाळणाघर यासाठी प्रयत्न करण्यात आले.
4. कामगारांची रात्रपाळी बंद करण्यात आली.
5. स्त्री कामगारांना प्रसुतीपूर्व व प्रसुतीनंतर रजा देण्याची शिफारस करण्यात आली.
6. कामगारांच्या मजुरीची किमान मर्यादा ठरवून देणे. कामाचे तास कमी करणे.
7. गिरण्या व कारखाण्यातील कामगारांच्या नोकरीची शाश्वती व बढती.
8. भरपगारी, रजा आजारी रजा व अपघाती नुकसान भरपाई देणे.

9. कामगारांसाठी स्वतंत्र घर, त्यांच्या आरोग्याची काळजी व कामगारांच्या मुलांना शिक्षणाची सोय करणे.
10. औद्योगिक कलह विधेयकानुसार' कामगारांना संप करण्याचा अधिकार नव्हता. तो डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संप करण्याचा अधिकार मिळवून दिला.
11. बिडी कामगारांना संप करण्याचा अधिकार दिला.बिडी कामगार संघ स्थापन करण्याचा अधिकार मिळवून दिला.
12. 1945 ला कामगार कल्याण योजना 'लेबर चार्ट ' लागू केला.
13. कोळसा खाण कामगार कल्याण योजनेसाठी कोषाची स्थापना करण्यात आली.
14. महिला कामगारांच्या रात्रीच्या कामवर बंदी घातली.
15. 240 दिवस काम करणार,या कामगाराला कायम करणे यासाठी संघर्ष केला.

अश्याप्रकारे बाबासाहेबांनी सर्वोतपरी कामगारांच्या समश्या सोडविण्याचा प्रयत्न केला.दि. 15 सप्टेंबर 1938 च्या' ट्रेड डिस्प्युट बिला'च्या संदर्भात कौन्सिलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगाराचा अधिकार आणि मालकाने लादलेली बंधने याचा कडाडून विरोध केला. याच पार्श्वभूमिवर नोव्हेंबर 1938 स्वतंत्र मजुर पक्ष आणि गिरणी कामगारांनी एक दिवसाचा लाक्षणिक संप करण्याचा निर्धार केला.[7] स्वतंत्र मजुर पक्ष हा अस्पृश्यांचा पहिला राजकीय पक्ष होता. यात सर्व अस्पृश्य शेतकरी शेतमजूर व कामगार सामील होणे गरजेचे होते परंतु तसे झाले नाही. पुर्वाश्रमीच्या महार समाजाने या पक्षाला सहकार्य केले त्याप्रमाणे अस्पृश्यांमधील चांभार व मांतग या समाजाने फारसे सहकार्य केले नाही. विविध जातीधर्मातील शेतकरी शेतमजूर व कामगारवर्ग जातीच्या व धर्माच्या नावाखाली विभागला गेल्यामुळे या सर्वांचे फारसे सहकार्य लाभले नाही.' [8]

**मजुर मंत्री असतांना केलेले कार्य:**

डॉ.बाबासाहेबांनी मंत्रीमडळामध्ये 20 जुलै 1942 मजुर मत्री म्हणून सुत्रे हाती घेतली. त्यांनी श्रमिकांचा संरक्षक व उध्दारक म्हणून खूप महत्वाची भुमिका निभावली. त्यांनी कामगारावरील अन्याय दूर व्हावा म्हणून 'इंडियन लेबर कौन्सिल' निर्माण केले. सन 1943 मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर मजुरमंत्री असतांना महत्वाचे विधेयक पास केले. कामगारांच्या हिताच्या दृष्टीने कायदयाची वाटचाल करण्याची जी गरज तातडीची होती. त्याकडे लक्ष देऊन डॉ.बाबासाहेबांनी मध्यवर्ती विधिमंडळात विधेयक मंजुर करून घेतले.[9] त्यानुसार भरपगारी रजा कामगारांना बारामही मिळण्याच्या महत्वाचा प्रयत्न ठरला. कारखाने, खाणकामगार, चहाचे मळेतील कामगार, स्त्री कामगार यांचे कामाचे तासाची निशिती, जखमी कायदा व मजुर विमा याविषयी महत्वपूर्ण कार्य केले. त्यांनी केवळ कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांचाच विचार केला असे नव्हे तर शेतीवर काम कराणाऱ्या कामगारांचेही प्रश्न त्यांना सतावत होते.

**निष्कर्ष :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनापासून कामगारांसाठी सर्वांगीणदृष्टया महत्वपूर्ण कार्य केले. माणूस म्हणून प्रत्येक क्षेत्रातील कामगारांना न्याय देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. कामगारांच्या न्याय हक्क व मागण्यांसाठी त्यांनी 'स्वतंत्र मजुर पक्षाची' स्थापना केली. वृत्तपत्रे, पाक्षिक व मौखिक सांधनाव्दारे कामगारांमध्ये जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला. डॉ.बाबासाहेबांनी स्वतः पुढाकार घेऊन विधि मंडळात कामगार हितासाठी कायद्यात सुधारणा घडवून आणल्या व कामगार हितासाठी आपले कामगार कल्याण विधेयक किती पुरोगामी आहे हे दाखवून दिले. त्यांनी कामगार वर्गाला त्यांचे हक्क मिळवून दिले. संविधानामध्ये कामगार वर्गाला विशेष अधिकार देण्यात त्याचाच मोठा वाटा आहे. त्यांचे जिवनमान उंचविले म्हणून कामगार क्षेत्रातील त्यांचे काम कोणत्याही कामगार नेत्यापेक्षा श्रेष्ट आहे असे म्हणावे लागेल.

**संदर्भ ग्रंथ**

1. गायकवाड प्रदिप (संपा.), 'कामगार चळवळ' डॉ.आंबेडकरांची निवडक भाषणे व लेख, क्षितिज पब्लिकेशन, नागपूर, आवृत्ती 5 वी, 2012, पे.न. 40
2. धनंजय कीर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,सहावी आवृत्ती, 1983, पृ.क्र.137.
3. कित्ता, पृ.क्र.138.
4. वसंत मून हरी नरके इ., डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड-18 भाग-3, डॉ.बाबासाहेब चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन, 15 ऑक्टोबर 2002, पृ.क्र.106.
5. 5. कीर्ती विमल, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेला स्वतंत्र मजुर पक्ष जडण घडण आणि धोरण, प्रबोधन प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती 25 डिसें. 1979 पे न.15.
6. 'टाईम्स ऑफ इंडिया', दि.15 ऑगस्ट 1936.
7. https://mr.wikipidiya,org-wiki.
8. क्षीरसागर आर.के., भारतीय रिपब्लिकन पक्ष, प्रथमावृत्ती नाथ प्रकाशन, औरंगाबाद, जुलै 1979, पे.न.10.
9. डॉ.निकुंभे सी.एच., समाजप्रबोधनकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे, पे.न. 169.